**संपादकीय...........**

'नवज्योत' या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेच्या लेखक, वाचक व हितचिंतकांना नवव्या वर्षातील हा दुसरा अंक समर्पित करताना आनंद होत आहे. या अंकास संशोधक, लेखकांचा अपूर्व असा प्रतिसाद लाभलेले आहे. चालू वर्षी'नवज्योत' संशोधन पत्रिकेस IIJIF कडून *6.013* इतका *IMPACT FACTOR* प्राप्त झाला असून *IMPACT FACTOR* काढणाऱ्या विश्वभरातील चार मान्यता प्राप्त संस्थाकडून मानांकन प्राप्त झाले. नजीकच्या काळात स्कोपस व युजीसीच्या लिस्टमध्ये येण्यासाठी संपादक मंडळ प्रयत्नशील आहे. नवज्योतच्या ई आवृत्तीची मान्यता नजीकच्या काळात मिळवण्याचा प्रयत्नही सुरु आहे.

राज्यशास्त्र विभाग व नेहरू अभ्यास केंद्र शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे २६ वे अधिवेशनाच्या निमित्ताने घेतलेल्या वेबिनारसाठी प्राप्त संशोधन लेखातील निवडक दर्जेदार संशोधन लेखांना या अंकांत समावेश करण्याचे भाग्य आम्हास लाभले आहे. हा आम्ही आमचा सन्मान समजतो.

नवज्योतच्या या अंकांत सामाजिक व विज्ञान विद्याशाखेतील विविध विषयातील संशोधकांनी महाराष्ट्रातील नव सामाजिक चळवळी, नेहरूवादी नव सामाजिक चळवळी, सहकार व शैक्षणिक चळवळी आणि करोना संकट या विषयावर विस्तृत विचारमंथन केले असून हा अंक वाचकांच्या पसंतीस उतरून त्याच्या ज्ञानात निश्चित भर घालेल अशी आशा आहे. भविष्यात ही आपणाकडून असाच पाठींबा व सहकार्य मिळावे ही अपेक्षा.

धन्यवाद !

प्रा. डॉ. रविंद्र भणगे
संपादक 'नवज्योत'